नि.दि.दा.क्र. १७१/२०२३
मंगल –वि– अशोक वगैरे

## नि.क्र. २२ वरील आदेश

## (पारीत दि. १२ जुन २०२५ रोजी)

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. १ दिनांक १८.०१.२०२५ रोजी विना लेखी कैफियत झालेला हुकुम रद्द करून लेखी कैफियत स्विकारण्याची परवानगी मिळण्याबाबत सादर केलेला आहे.

2. प्रतिवादी यांचे असे कथन आहे की, सदर कामातील प्रतिवादी हे परगावी गेले असल्याने त्यांना लेखी कैफियत मुदतीत दाखल करता आली नाही, असे कथन करून अर्ज मंजुर करण्याची विनंती केली.

3. प्रस्तुत अर्जावरच वादीनी त्यांचे म्हणणे देवुन आक्षेप नोंदविला आहे. वादीचे असे कथन आहे की, प्रतिवादी यांनी विलंबाबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा याकामी दाखल केला नाही. केवळ वादी यांना त्रास देण्याच्या हेतुने सदरचा अर्ज दाखल केला असल्यामुळे तो फेटाळण्यात यावा अशी विनंती केली आहे.

4. वादी व प्रतिवादीतर्फे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. त्यांनी त्यांचे अर्ज व म्हणण्याप्रमाणे युक्तिवाद केलेला आहे. प्रतिवादीने अर्जाच्या पुष्ट्यर्थ कोणतीही कागदपत्रे सादर केलेली नाहीत. परंतु, निसर्गन्याय तत्वानुसार दोन्ही बाजुंचे म्हणणे आवश्यक आहे. सदर दाव्यात प्रतिवादी लेखी कैफियत दाखल करीत आहेत. लेखी कैफियत अभिलेखावर घेतल्यास सदर दाव्याचा गुणानुगुणावर निपटारा होण्यास सदर लेखी कैफियत अभिलेखावर घेतल्याने मदतच होणार आहे. त्यामुळे वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. पण लेखी कैफियत अभिलेखावर न घेतल्यास प्रतिवादीचे कशानेही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. प्रतिवादीने

नि.दि.दा.क्र. १७१/२०२३
मंगल –वि– अशोक वगैरे

लेखी कैफियत देण्यास केलेल्या उशीरामुळे वादीस झालेल्या त्रासाची भरपाई काही रक्कम वादीना देवुन करता येईल. सबब, वरील कारणाचा विचार करुन खालील आदेश पारीत करण्यात येतात.

**आदेश**

1. अर्ज नि.क्र २२ मंजुर करण्यात येत आहे.
2. प्रतिवादी क्र. १ विरूध्दचा विना लेखी कैफियत आदेश रद्द करण्यात येतो.
3. प्रतिवादीने, झालेल्या विलंबापोटी, वादीस रक्कम रु. २००/– (रु दोनशे फक्त ) पुढील तारखेपर्यंत दयावेत.
4. प्रतिवादीने पुढील तारखेपर्यंत पुर्तता न केल्यास, सदरचा आदेश आपोआप रद्द होईल.
5. पक्षकारांनी आदेशाची नोंद घ्यावी.

MAHESH ARVINDRAO KULKARNI
Digitally signed by MAHESH ARVINDRAO KULKARNI
Date: 2025.06.12 16:49:26 +0530

(एम. ए.कुलकर्णी)

दि. १२.०६.२०२५

सह दिवाणी न्यायाधिश (क.स्तर),
कवठेमहांकाळ.